Satam UDYOG®

# बाल्कनीतील बाग



नंदकुमार टेणी

# बाल्कनीतील बाग

: लेखक :

**नंदकुमार टेणी**



सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

● ई-बुक आवृत्ती

● लेखक : नंदकुमार टेणी

● प्रकाशक : हेमंत स. साटम

● मुद्रक : साटम उद्योग
२०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
८१६९९ ८४९२७

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

# अनुक्रम :


- भूमिका .................................................. ४
- काही संवाद काही फॅक्ट्स .................................. ५
- महत्वाचे प्रश्न .............................................. ६
- प्रश्नांची उत्तरे व नियोजन .................................. ७
- प्रत्यक्ष बागकाम सुरु करतांना ............................... ९
- कुंडीची निवड ................................................ १०
- माती कशी व किती व कोणती ............................... ११
- रोपांची निवड (रोपे की वेल) ................................ १२
- उपयुक्त खाद्य रोपे ........................................... १४
- कुंडी लावावी कशी .......................................... १५
- रोपांची काळजी .............................................. १६
- खत कसे द्यावे ................................................ १८
- भलते प्रयोग नको ............................................ १९
- छाटणी ......................................................... २०
- कुंड्यांची बाह्य सफाई ...................................... २२
- कुंडीची अंतर्गत निगा ....................................... २३
- नव्या मातीची भराई ......................................... २५
- हँगीग ......................................................... २५
- गावी जाताना ................................................ २८
- बागकामातून स्वच्छता, स्वच्छतेतून बचत ................. २९
- नित्य नवे आम्हां हवे ......................................... ३०

# भूमिका :

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे**
**पक्षीणी सुस्वरे आळविती**
**वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे !**

अशा शब्दात संतांनी मानवाचे वृक्षांशी असलेले प्राचीन नाते वर्णिले आहे. आज आपण सिमेंट काँक्रिटच्या जंगलात राहतो. तरीही वृक्ष, वेली, रोपे, फुले याच्याशी असलेले आपले आदिम नाते आपण कुंडीतील तुळस, बाल्कनीतील बगीचा, हँगींगचे शो पिस याद्वारे जपू पाहतो. कधी त्यात कुणाला यश येते तर अनेकांचे प्रयत्न लहानसहान त्रुटींमुळे, काही बाबींची माहिती नसल्यामुळे विफल ठरतात. हे प्रयत्न सुफल व्हावे म्हणून हा लेखन प्रपंच. बाल्कनीतील बागेची सौंदर्यपूर्ण आणि अभिमान वाटावा अशी जोपसना करण्याचा मार्ग दाखविणारी ही पुस्तिका झाडे, रोपे यांच्याशी मानवाच्या असलेल्या आदिम नात्याला उजाळा देणारी, ते अधिक दृढ करणारी ठरेल. असा विश्वास वाटतो. केवळ पारंपारिक रोपांचा विचार न करता पाणी, सूर्यप्रकाश यांच्या उपलब्धतेनुसार वाढणारी आधुनिक नव्या प्रकारची रोपे, केवळ शोभेची फळे देणारी रोपे, नवीन रंग, रुप आकाराची रोपे यांच्याबद्दलच्या माहितीचाही समावेश नव्या आवृत्तीत आवर्जून केला आहे. तो वाचकांसाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

**नंदकुमार टेणी**